**अर्जदाराचा शपथेवर सरतपास श्री मानकर प्रतिनीधी.**

०३. मी, **सुरेश मोतीराम सनगाळे**, वय – **५९ वर्षे,** व्यवसाय – **काही नाही,** राहणार –**आगर, ता. जि. अकोला**, शपथेवर कथन करतो की, माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांनी दि. २९/०४/२०१७ रोजी दिलेल्या सेवानिवृत्ती आदेशाची छायांकीत प्रत तसेच उपदान हिशोबाचा तक्ता या दस्ताच्या छायांकीत प्रती न्यायालयात दाखल केल्या आहे. सदर दस्त गैरअर्जदार यांनी मान्य केल्या आहेत. सबब त्यास अनुक्रमे **नि. यु–७, व यु–८** देण्यात येत आहे. तसेच गैरअर्जदार यांना दि. २०/१२/२०१७ रोजी पाठविलेल्या अर्जाची स्थळप्रत न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे तसेच गैरअर्जदार यांची पोहोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि. ९** देण्यात येत आहे.

**अर्जदाराचा उलटतपास ॲड देशमुख वकीलसाहेब.**

०५. माझी एकुण सेवा ३७ वर्षे झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुट्टी, हजर, गैरहजर दिवस याची नोंद सेवापुस्तकात होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरून अहवाल तयार केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, मी ४ वर्षे २४० दिवस काम केले नाही म्हणुन ३७ वर्षामधुन ४ वर्ष वजा केले. हे म्हणणे खरे नाही की दि. ०१/०७/१९९८ ते ३०/०६/१९९९ या कालावधीमध्ये १७० दिवस हजर होतो, दि. ०१/०७/१९९९ ते ३०/०६/२००० या कालावधीमध्ये १४९ दिवस हजर होतो, दि. ०१/०७/२००० ते ३०/०६/२००१ या कालावधीमध्ये ७४ दिवस हजर होतो, दि. ०१/०७/२००२ ते ३०/०६/२००३ या कालावधीमध्ये १७४ दिवस हजर होतो.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**(एस. एस. शिंदे)**
**पिठासीन अधिकारी**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांक :– १२/०४/२०१८**